RNI No. MAHBIL /2009/31748

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–अ-मध्य उप-विभाग

वर्ष ४, अंक ३४] गुरुवार, जुलै २६, २०१८/श्रावण ४, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

### असाधारण क्रमांक ६८

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राजकीय पक्ष नोंदणी सुधारित आदेश, २०१८.**

(१) नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याबाबत.

(२) पाच वर्षांत निवडणुकीमध्ये एकही उमेदवार अंतिमतः उभा न करणाऱ्या राजकीय पक्षाची नोंदणी रद्द करण्याबाबत.

(३) निवडणुकीत प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यामध्ये दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करणाऱ्या राजकीय पक्षाची नोंदणी रद्द करण्याबाबत.

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ जुलै २०१८.

**राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ (सुधारित २०१८).**

क्र. रानिआ/रापनों.२०१८/प्र.क्र.८/का.११.—ज्याअर्थी, संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यातील तरतुर्दीन्वये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त आहेत.

२. आणि ज्याअर्थी, राजकीय पक्षांच्या आधारावर लढविल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये (महानगरपालिका, नगरपरिषदा / नगरपंचायती, जिल्हापरिषदा व पंचायत समित्या) राजकीय पक्षांना त्यांची महत्त्वाची भूमिका अदा करणे शक्य व्हावे यासाठी राज्य निवडणूक आयोगाने नोंदणी, चिन्ह वाटप इत्यादी बाबींसाठी खालीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत :–

(i) राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००४ (यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली असून सध्या दि. ३१ मार्च २००९ हा आदेश अस्तित्वात आहे.) व

(ii) महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९.

३. आणि ज्याअर्थी, आतापर्यंत झालेल्या निवडणुकीच्या अनुभवावर अनेक राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था, विचारवंत व्यक्ती इ. यांनी पक्षाची नोंदणी प्रक्रिया व त्यांच्या भूमिकेबाबत राज्य निवडणूक आयोगाला खालीलप्रमाणे सूचना केल्या आहेत :-

(i) सध्याची नोंदणी पद्धत क्लिष्ट असल्याने ती विकेंद्रीत करून संगणकाद्वारे राबवून सुलभ करावी.

(ii) जे नोंदणीकृत राजकीय पक्ष एकही उमेदवार अंतिमतः उभा करीत नाहीत त्यांची नोंदणी रद्द करावी.

(iii) जे राजकीय पक्ष निवडणुकांच्यावेळी दिलेली आश्वासने सत्ता स्थापन केल्यानंतर पूर्ण करीत नाहीत त्यांची नोंदणी रद्द करावी.

४. आणि ज्याअर्थी, या व इतर विषयांवर राज्य निवडणूक आयोगाने नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांबरोबर केलेल्या अनेक व सर्व नोंदणीकृत राजकीय पक्षांबरोबर (सुमारे २५०) दि. ७ मे, २०१८ रोजी केलेल्या चर्चेच्यावेळी राज्य निवडणूक आयोगाने राजकीय चळवळीला प्रोत्साहित करण्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही तातडीने करावी असे मत बहुतांशी राजकीय पक्षांनी व्यक्त केले.

५. आणि ज्याअर्थी, सर्व बाबींचा सखोल विचार करता, लोकशाही सुदृढ करण्याच्यादृष्टीने वरीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे या निष्कर्षाप्रत राज्य निवडणूक आयोग पोहचला आहे.

६. त्याअर्थी, महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :—

**आदेश**

(i) परिच्छेद ३ (२) मध्ये

" अर्ज आयोगाच्या सचिवांकडे सादर करावा किंवा तो नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात यावा " **याऐवजी** पुढीलप्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे.

*" असे अर्ज ज्या जिल्ह्यामध्ये सदर राजकीय पक्षाचे मुख्य कार्यालय असेल, त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावेत. जिल्हाधिकारी यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जांची या आदेशातील तरतुदीनुसार तपासणी करून व अर्जात त्रुटी असल्यास, त्याची पूर्तता करून त्यांचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव अभिप्रायासह अंतिम निर्णयासाठी अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावा. यानंतरची सर्व प्रक्रिया राज्य निवडणूक आयोग या आदेशातील तरतुदीनुसार पार पाडेल. मात्र असा पक्ष जर भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त नोंदणीकृत पक्ष असेल (राष्ट्रीय, राज्य अथवा इतर राज्यस्तरीय पक्ष) तर त्यांनी सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचेकडे अर्ज करावा. "*

**(ii) परिच्छेद ३ (३) (इ) या मध्ये...**

" सदस्यांची नावे व त्यांचा मतदार यादीतील नोंदणीबाबतचा अद्ययावत तपशील द्यावा " **या नंतर**

*" अर्जासोबत द्यावयाच्या किमान १५० सदस्यांचा अद्ययावत तपशीलामध्ये खालील बाबींचा समावेश असावा :-*

- *पदाधिकारी / सदस्यांचे नाव,*
- *सर्व पदाधिकारी / सदस्यांचा विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत असलेल्या नावाचा तपशील ज्यामध्ये विधानसभा मतदार संघाचा अनुक्रमांक, विधानसभा मतदार संघाचे नाव, यादी भाग क्रमांक व अनुक्रमांक यांचा समावेश असावा.*
- *वरील सर्व पदाधिकारी / सदस्यांच्या विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीची प्रमाणित प्रत.*
- *सर्व सदस्यांच्या मतदार ओळखपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत.*

*वरील सर्व सदस्य हे त्यांच्याच पक्षाचे सदस्य असून इतर कोणत्याही राजकीय पक्षाचे सदस्य नाहीत अशा आशयाचे पक्षाच्या अध्यक्षाचे शपथपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे. "*

**(iii) परिच्छेद ३ (३) (ह) नंतर—**

**पुढील नवीन परिच्छेद** समाविष्ट करण्यात येत आहे :-

*"३(३) (ज)- राजकीय पक्षाचे मुख्य कार्यालय ज्या ठिकाणी / इमारतीमध्ये असेल, त्या ठिकाणाच्या / इमारतीच्या मालकाचे संबंधित राजकीय पक्षास त्यांचे ठिकाण / इमारत मुख्य कार्यालयासाठी वापरण्यास हरकत नसल्याचे प्रमाणपत्र. त्याचप्रमाणे सदर ठिकाणी / इमारतीमध्ये पक्ष कार्यालय सुरू करण्यास ते ठिकाण / इमारत ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीमध्ये येते, त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची हरकत नसल्याचे प्रमाणपत्र.*

**(iv) परिच्छेद ४(१) (ड)** - यानंतर पुढीलप्रमाणे परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :—

*" ४ (१)(इ) - यापूर्वी नोंदणी झालेल्या राजकीय पक्षांनी या सुधारणा आदेशाच्या दिनांकापासून ५ वर्षांच्या कालावधीत राज्यातील कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये (ग्रामपंचायत वगळून) किमान एक उमेदवार निवडणुकीमध्ये अंतिमतः उभा केला नसल्यास आणि जे राजकीय पक्ष या आदेशाच्या दिनांकानंतर नोंदणीकृत होतील यांनी त्यांच्या नोंदणीच्या दिनांकापासून ५ वर्षांच्या कालावधीमध्ये राज्यातील कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये (ग्रामपंचायत वगळून) किमान एक उमेदवार अंतिमतः उभा केला नसल्यास, "*

(उमेदवार अंतिमतः उभा करणे याचा अर्थ संबंधित उमेदवाराने निवडणुकीसाठीचा आपला अर्ज मागे न घेता प्रत्यक्ष निवडणूक लढविणे असा समजण्यात यावा.)

*४ (१)(ई) - नोंदणीकृत राजकीय पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्यावेळी मतदारांसाठी जाहिरनामा (कोणत्याही नावाने) प्रसिद्ध केला असल्यास, त्याची एक अधिकृत प्रत महानगरपालिका निवडणुकीच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे व नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकांच्याबाबतीत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांचेकडे पक्षाच्या पदाधिकाऱ्याने सादर करणे आवश्यक असेल. या प्रतीवर संबंधित पक्षाच्या राज्यस्तरीय अथवा जिल्हास्तरीय अध्यक्ष अथवा सचिव यांची स्वाक्षरी असणे आवश्यक असेल.*

*अशा निवडणुकीमध्ये निवडणूक जिंकल्यानंतर ज्या राजकीय पक्षाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सत्ता स्थापन केली असल्यास किंवा जे राजकीय पक्ष संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सत्तेमध्ये सहभागी झाले असल्यास (हा कालावधी ५ वर्षांपेक्षा कमी कालावधीचा असू शकतो) त्या राजकीय पक्षाने वरील जाहिरनाम्यात दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेचा वार्षिक अहवाल जनतेच्या माहितीसाठी जाहिरातीद्वारे अथवा वेबसाईटवर प्रसिद्ध करणे आवश्यक असेल व त्याची एक प्रत महानगरपालिकेच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त व नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हापरिषद व पंचायत समिती यांच्याबाबतीत संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचेकडे देणे अनिवार्य असेल. वरीलप्रमाणे सादर करावयाच्या जाहिरनाम्याची प्रत व सत्तेमध्ये असताना किंवा सत्तेत सहभागी असताना सलग २ वर्षांसाठी अशा जाहिरनाम्याचे आश्वासनपूर्तीचे वार्षिक अहवाल सादर न केल्यास - "*

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**शेखर चन्ने,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.